चिपळूण नगर परिषदेकडून

वार्षिक दर करार (जाहीर निविदा)

चिपळूण नगर परिषदेचे कार्यालयात वार्षिक सन (२०११-१२) आवश्यक असणारे साहित्याचा दर करारासाठी दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहे. इच्छुक योग्य पात्रताधारकांनी त्यांच्या सिलबंद निविदा दिनांक ०७/०५/२०११ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत निविदा पेटीमध्ये टाकावी.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | बयाणा रक्कम | आवश्यक पात्रता सर्वांसाठी | फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद पाणी पुरवठा विभागासाठी साहित्य, स्पेअरपार्ट, स्टेशनरी पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे | १०००/- | १. साहित्य पुरवठा संबंधी नगर परिषद हद्दीतील / अथवा महानगर पालिका हद्दीत दुकाने व आस्थापना कायदयाखाली रजिस्ट्रेशन<br>२. वॅट रजिस्ट्रेशन<br>३. अनुभवाचा दाखला आवश्यक<br>४. शासनाकडे दर करार यापूर्वी केली असल्यास त्याबाबत दाखला. | २००/- |
| २ | नगर परिषद वाहन विभागास साहित्य पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |
| ३ | नगर परिषद दवाखाना विभागास साहित्य औषधे पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |
| ४ | नगर परिषद बांधकाम विभागास साहित्य पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |
| ५ | नगर परिषद अभिलेख व भांडार विभागास साहित्य पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |
| ६ | नगर परिषद संगणक विभागास साहित्य पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |
| ७ | नगर परिषद आरोग्य विभागास साहित्य पुरविणे व कामे करणे बाबतचे वार्षिक दर करार करणे. | १०००/- | | २००/- |

**अटी व शर्ती :-**

१) निविदा संबंधी अटी व शर्ती तसेच सविस्तर माहिती निविदा फॉर्ममध्ये तसेच नगर परिषद अभिलेख व भांडार विभागात पहाणीसाठी उपलब्ध आहेत.

२) दिनांक २८/०४/२०११ पासून ते दिनांक ०४/०५/२०११ पर्यंत एक खिडकीमध्ये निविदा फॉर्मसाठी रक्कम जमा केल्यानंतर निविदा फॉर्म मिळेल.

३) दर करारासंबंधी अधिक माहिती नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळी वरिष्ठ लिपीक अभिलेख व भांडार विभाग यांचेशी संपर्क साधल्यास मिळू शकेल.

४) कोणतीही निविदामधील दराबाबत खात्री करणे तसेच कोणतीही निविदा दर स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवले आहेत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे www.cmcchiplun.org या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

## चिपळूण नगर परिषद
## वार्षिक दर करार अटी व शर्ती (२०११-१२)

१. निविदे मधील शर्तीनुसार मालाचा पुरवठा संबंधीत विभागाने वार्षिक दर पत्रकाप्रमाणे आदेश दिल्या नंतर करावयाचा आहे.
२. निविदे मधील तपशिलानुसार मालाचा पुरवठा सुस्थितील करण्याच्या शर्तीवर हुकूम करण्याची जबाबदारी लिहून देणार याची राहील.
३. निविदे मधील तपशिलानुसार मालाचा पुरवठा करण्याचे बाबत लिहून घेणार चिपळूण नगरपरिषद यांना पूर्ण अधिकार राहील.
४. निविदे मधील शर्तीनुसार मालाचा पुरवठा न केल्यास लिहून देणार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार लिहून घेणार यांस राहील.
५. विहीत मुदतीत निविदेनुसार मालाचा पुरवठा न केल्यास नगर पालिकेस फेर निविदा काढावी लागल्यास व त्यामुळे चिपळूण नगरपालिकेला जास्त आर्थिक भार पडल्यास किंवा आर्थिक हितास बाधा आल्यास त्याची पूर्ण भरपाई लिहून देणार यांचेवर राहील व ती विना तक्रार लिहून देणार यांनी करावयाची आहे. त्यामुळे निविदे सोबत भरलेले डिपॉझिट नगर पालिका फंडात जमा होईल.
६. लिहून देणार यांचे कोणत्याही कृतीने उपरोक्त कामात नगर परिषदेचे आर्थिक हितास बाधा आल्यास नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई करुन देण्यासाठी लिहून देणार तसेच त्यांचे पश्च्यात त्यांचे कायदेशीर वारसदारावर राहील.
७. शर्तीनुसार मालाचा पुरवठा न केल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास संपूर्ण नुकसान भरपाईची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.
८. निविदे मधील विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास मुदत संपलेपासून पुढे होणा-या विलंबासाठी प्रत्येक दिवसांसाठी दंड म्हूणन रक्कम रुपये १००/- प्रमाणे लिहून देणार यांनी भरणेचा आहे.
९. कोणताही वाद निर्माण झाल्यास नगर परिषदेचा निर्णय अंतीम राहील व तो लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील.
१०. लिहून देणार यांनी निविदा कामाचे मुदतीत मालाचा पुरवठा करणेचा आहे तरी मालाचा पुरवठा न केल्यास सदर काम वरील अटी प्रमाणे कार्यवाही करणेचा अधिकार नगर परिषदेस राहील.
११. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना मालाचा पुरवठा करण्याच्या संदर्भात देतील त्या सर्व सूचनांचे पालन करण्याचे बंधन राहील.
१२. लेखा परिक्षणात सदर कामी कोणताही आक्षेप आल्यास अगर जादा रक्कम प्रदान झाल्याचे आढळल्यास ती रक्कम आपले बिलातून किंवा डिपॉझिट मधून कापून घेणेत येईल.
१३. बिलातून नियामाप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझिट कापून घेण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांस राहील.
१४. बिलातून नियमाप्रमाणे आयकर व वॅट कापून घेणेत येईल.
१५. दरपत्रकाप्रमाणे मंजूर केलेल्या मालाचा पुरवठा संबंधीत विभागाच्या मागणी नुसार करावयाचा आहे. पुरवठा धारकांने पुरवठा केलेल्या माला प्रमाणे बिल आदा करणेत येईल.
१६. वार्षिक निविदा दराप्रमाणे मालाच्या दरामध्ये वाढ झाल्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ देण्यात येणार नाही.
१७. सदरहु निविदेमध्ये नमूद केलेले दर हे मार्च २०१२ पर्यंत ठेकेदारांवर बंधनकारक राहतील. कोणत्याही प्रकारची दरवाढ मिळणार नाही.
१८. प्रत्यक्षात आवश्यक ते नुसार मालाची मागणी केली जाईल त्यामुळे ती कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
१९. वरील कामे करणे बाबतची सविस्तर माहिती करीता संबंधीत विभाग प्रमुखांकडून माहिती घेवूनच दर दयावयाचे आहेत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद